N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** देगलूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0532 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/11/2025 21:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 19/11/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/11/2025

**Time From (वेळेपासून):** 11:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/11/2025 **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/11/2025 21:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, देगलुर चे परीसरा,देगलुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** करीम खान सालार खान पठाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक वि नांदेड ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक वि नांदेड ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8668361977

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वामन शेषराव बिरादार | | | 1. ग्रामपंचायत भायेगाव, देगाव, पंचायत समिती, देगलुर,देगलुर, देगलूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या 8 भारतीय चलनी नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 19/11/2025

मी करीम खान सालार खान पठाण, वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8668361977.
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महिन्यापासुन पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.
आम्ही दि. 17/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार सो, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग पि. मिर्झा रहेमत बेग, व्यवसाय शेती, रा. भायेगाव, ता. देगलुर, जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशित केले.
त्यावरून आम्ही तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग यांनी कळविले की, त्यांचे काका मिर्झा समी बेग पि. अहेमद बेग, रा. भायेगाव, ता. देगलुर यांना घरकुल मंजुर झाले असून घरकुलाचा पहिला हप्ता दिनांक 03/09/2025 रोजी मिळाला असून आता दुसरा हप्ता मिळण्याकरीता शिफारस करण्यासाठी माझे काका मिर्झा समी बेग हे अंदाजे 15 दिवसापुर्वी ग्रामविकास अधिकारी श्री वामन शेषराव बिरादार यांना जावून भेटले. तेव्हा ग्रामविकास अधिकारी श्री बिरादार यांनी तक्रारदार यांचे काकाला 5000/- रूपयाची मागणी करीत असल्याची बाब तक्रारदार यांना त्यांचे काकाने सांगितल्याने तक्रारदार मिर्झा मुमताज बेग हे स्वतः दिनांक 13/11/2025 रोजी ग्रामविकास अधिकारी श्री बिरादार यांना पंचायत समिती, देगलुर येथे भेटले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी श्री बिरादार यांनी त्यांना पण जर तुमच्या चुलत्याचे घरकुलाचे दुसरा हप्ता मिळण्याचे काम करायचे असेल तर 5000/- रूपये द्यावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. तक्रारदार व ग्रामविकास अधिकारी श्री वामन बिरादार यांच्यात पैश्याचा देण्या-घेण्याचा कोणताही व्यवहार नसून वैर, दुश्मनी नसल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. तक्रारदार व त्यांचे काका यांना सदरची रक्कम 5000/- रूपये ही लाच असल्याची खात्री झाल्याने त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग यांना त्यांचे काका श्री मिर्झा समी बेग पि. अहेमद बेग यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे ग्रामविकास अधिकारी श्री वामन बिरादार यांच्याविरूध्द तक्रार देण्यासाठीचे प्राधिकारपत्र दिले असून ते लोकसेवकास भेटण्यास जाणार आहे. वगैरे प्रमाणे तक्रार दिली आहे.
आम्ही दिनांक 17/11/2025 रोजी मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना पत्र देवून त्यांचे कार्यालयाचे 1) नितिन साहेबराव जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - टंकलेखक लिपीक, नेमणुक प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड, रा. डिंडाळा, ता. उमरखेड, जि. यवतमाळ, 2) शेख जाकीर हुसैन शेख मौलाना, वय 53 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - टंकलेखक लिपीक, नेमणुक प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड, रा. देशमुख नगर, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड असे दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले.
दि. 18/10/2025 रोजी आम्ही आमचे खाजगी वाहन कार क्रमांक एमएच 19 बी.जे. 2066 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडचे कार्यालयातून दोन शासकीय पंच व सापळा पथकातील अंमलदार सपोउपनि शेख रसुल व पोहेकॉ/305 अरशद अहेमद खान यांच्यासह 09.50 वाजता नांदेड येथून निघून देगलुरच्या अलीकडे खानापुर शिवारात गोविंद वेअर हाउसच्या परिसरात नियोजित निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार व त्यांचे काका हे त्याठिकाणी आले. दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांनी परत तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 17/11/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार व त्यांचे काका असे सर्वानुमते लाच मागणी पडताळणी

करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर आम्ही तेथून देगलुर शहरात इदगाह मैदानाजवळ निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोह/अरशद अहेमद खान यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांनतर पोह/अरशद अहेमद खान यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.
त्यानंतर लोकसेवक श्री वामन बिरादार हे दुपारी 16.30 वाजेपर्यंत पंचायत समिती कार्यालय, देगलुर येथे न आल्याने त्यांचे ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 7410704167 वरून ग्रामविकास अधिकारी/ग्रामपंचायत अधिकारी वामन बिरादार यांचे मोबाईल क्रमांक 9545501551 वर 16.49 वाजता कॉल केला असता, त्यांचा मोबाईल क्रमांक व्यस्त असल्याचे दाखविले. त्यानंतर परत 16.58 वाजता कॉल केला. त्यांनी कॉल उचलून मी गावाकडून नांदेडला आलो आहे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी कधी भेटता असे विचारल्यावर उदया पंचायत समिती, देगलुरला आहे असे सांगितले. सदरचे कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे. सदर दिवशी लोकसेवक यांची भेट होणार नसल्याने लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई स्थगित करून आज दिनांक 19/11/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले.
दिनांक 19/11/2025 रोजी आम्ही पंच व सापळा पथकासह देगलुर शहरातील ईदगाह परिसरात मैदानात 11.15 वाजता येवून नियोजित निर्जनस्थळी थांबलो. थोडया वेळात तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग हे त्याठिकाणी आले व त्यांनी ग्रामविकास अधिकारी/ग्रामपंचायत अधिकारी वामन बिरादार हे पंचायत समिती कार्यालय, देगलुरला आलेले आहेत असे कळविले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लाच पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. वेळ 11.45 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 नितिन जाधव यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, देगलुर येथे रवाना केले.
वेळ 11.57 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली असता, लोकसेवक व तक्रारदार यांचे मध्ये तक्रारदार यांचे काका समी यांचे घरकुलाचे हप्त्यासंबंधाने चर्चा झाली. त्यामध्ये लोकसेवक बिरादार यांनी तक्रारदार यांना सांगितले की, ''काय तुम्हालाच माहित, ते तेयला देवून टाकून द्या म्हणाव, कोण त्या माणस इंजिनिअरला, आपल्याला काही लागना तेयच, काय लागते. हं, ते इंजिनिअरला तर द्यावच लागते, पाच हजार घेवूलालेत ते आता सध्या, पण दुस-या बिलाला काय आता मागल ते, नाही त्याला, मी कशाला त्यालाच द्या, त्यांनाच द्या म्हणाव इंजिनिअरला त्या, मी काय, दोन, तीन हजार रुपय त्यालाच, त्याच्या हातात द्या म्हणाव डायरेक्ट, द्या म्हणालो की, काय एखाद कमी द्या, ते पाच म्हणलाले असतील दोघ जण, पाच म्हणालेत, दोघ जण हाईत ते, आमणारे आणि ते हेन आपल, बर जावू द्या की, काय तरी कमी जास्त द्या, काय दोन, तीन हजार, चार हजार, तीन हजार किंवा चार हजार देवून टाकून द्या म्हणाव काय हाय ते, देवून टाकून द्या''असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक वामन बिरादार यांची भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले. तरी लोकसेवक वामन बिरादार यांनी तक्रारदार यांचे काकाचे घरकुलाचा दुसरा हप्ता मिळण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4,000/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.
तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 4,000/- रुपये रक्कम (ज्यात पाचशे रुपये दराच्या 8 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. सपोउपनि शेख रसुल यांनी लाच रक्कम 4,000/- रूपये रकमेस (ज्यात पाचशे रुपये दराच्या 8 भारतीय चलनी नोटा) अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या उजव्या खिशात अलगद ठेवून दिले.
त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 13.04 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 नितिन जाधव यांच्यसोबत पंचायत समिती कार्यालय, देगलुर येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे पंचायत समिती कार्यालय, देगलुर येथे गेलो. त्यानंतर तक्रारदार हे पंचायत समिती कार्यालय, देगलूर येथून 13.25 परत आले व सांगितले की, ग्रामविकास अधिकारी/ग्रामपंचायत अधिकारी वामन बिरादार हे त्याठिकाणी नव्हते. त्यामुळे मी त्यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला असता, त्यांनी ''इथे मिटींगमध्ये हाय थोड, मिटींग हॉलमध्ये आहे, एक,एक अर्धा तास'' लागेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण तक्रारदार यांना अर्धा तासाने पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यादरम्यान 13.37 वाजता तक्रारदार यांना लोकसेवक वामन बिरादार यांचा कॉल येवून कट झाला. तेव्हा आम्ही

13.37 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांना लोकसेवक श्री वामन बिरादार यांच्या मोबाईलवर कॉल केला. लोकसेवक वामन बिरादार यांनी तक्रारदार यांना म्हणाले की, ''गेल्या, बर, बर जावु द्या, हाव इत मी, बाहेर आले की लावा फोन'' असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी ठिक आहे येतो असे सांगितले. लोकसेवक श्री वामन बिरादार यांच्याकडून स्वतःहून कॉल आल्याने तक्रारदार यांना लोकसेवक वामन बिरादार यांच्याकडे लाच स्विकृतीसाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.
वेळ 13.55 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांना लोकसेवक वामन बिरादार यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती, देगलुरचे कार्यालयात रवाना केले व आम्ही पण त्यांचे पाठोपाठ पंचायत समिती देगलुर येथे रवाना झालो. पंचायत समिती कार्यालयात लोकसेवक श्री वामन बिरादार दिसून न आल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर कॉल केला. त्यांनी जिल्हा परिषद, देगलुर येथील पाणी पुरवठा विभागात बसलो आहे तुम्ही याठिकाणी या असे म्हणाल्याने तक्रारदार हे जिल्हा परिषद, देगलुर येथील पाणी पुरवठा विभागात गेले व थोडया वेळात बाहेर आले. लोकसेवक यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला.
त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागातील इमारतीत गेलो असता, त्याठिकाणी लोकसेवक वामन बिरादार हे खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा आम्ही त्यांना आमचा परिचय देवून त्यांच्यावर अँन्टी करप्शनची कारवाई झाल्याचे कळविले व पंच क्र. 1 नितिन जाधव यांना लाचेची रक्कम 4000/- रुपये लोकसेवक यांनी कुठे ठेवली आहे असे विचारले. तेव्हा पंच क्रमांक 1 नितिन जाधव यांनी लोकसेवक यांनी त्यांचे शर्टाच्या वरच्या खिश्यात ठेवल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांना लोकसेवक यांच्या खिश्यातून अँन्थ्रॉसिन पावडरयुक्त 4000/- रूपये लाचेची रक्कम काढून लोकसेवक यांचे ताब्यातून हस्तगत करण्यात आली. त्यानंतर लोकसेवक वामन बिरादार यांना ताब्यात घेवुन सापळा पथकासह पोलीस स्टेशन देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड येथे हजर आलो.
तरी तक्रारदार श्री मिर्झा मुमताज बेग पि. मिर्झा रहेमत बेग यांनी दिनांक 17/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 19/11/2025 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक वामन शेषराव बिरादार, वय 52 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद ग्रामविकास अधिकारी/ग्रामपंचायत अधिकारी, नेमणूक ग्रामपंचायत भायेगाव, देगाव, पंचायत समिती, देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड यांनी तक्रारदार यांचे चुलते मिर्झा समी बेग पि. अहेमद बेग यांचे भायेगाव, ता. देगलुर, जि. नांदेड येथील मंजुर झालेल्या घरकुलाचा दुसरा हप्ता मिळण्याकरीता शिफारस करण्यासाठी दिनांक 19/11/2025 रोजी 11.45 ते 11.57 वाजण्याचे दरम्यान पंचायत समिती कार्यालय, देगलुरचे आवारात शासकीय पंचासमक्ष 5,000/- रुपये रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती 4,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली. त्यानंतर 13.55 ते 14.12 वाजण्याचे दरम्यान पंचायत समिती, देगलुरचे परीसरातील जिल्हा परिषद, पाणी पुरवठा विभागाचे कार्यालयात तक्रारदार यांचेकडून 4,000/- रुपयाची लाच लोकसेवक वामन बिरादार यांनी स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी सदर लोकसेवक यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे. फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MARUTI SHRIRAM MUNDE(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

HC 2640

ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन देगलूर जि. नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MARUTI SHRIRAM M

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API